


## इचलकरंजी महानगरपालिका
## गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय

- इचलकरंजी महानगरपालिकेचे गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय हे शहरातच नव्हे तर कोल्हापूर जिल्ह्यात नावलौकिक असलेले वाचनालय आहे.
- वाचनालयाची जुनी इमारत निष्कासित केली असून त्या ठिकाणी नवीन सुसज्ज सर्व सोयींनियुक्त इमारतीचे अंधाकाम चालू आहे. सध्या वाचनालयाचे कामकाज महापालिकेच्या मंगलधाम इमारतीमध्ये चालू आहे.
- गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाची इमारत प्रशस्त असुन यामध्ये पुस्तक देव – घेव विभाग, वृत्तपत्र विभाग , मासिके व पाक्षिके विभाग, मुलांची व मुलींची प्रशस्त अभ्यासिका आहे.
- वृत्तपत्र विभागामध्ये एकूण २२ प्रकारची वृत्तपत्रे , १२ मासिके, ४ पाक्षिके, ९ साप्ताहिके उपलब्ध आहेत.
- वाचनालयामध्ये एकूण २९००० विविध विषयांची पुस्तके उपलब्ध आहेत.

- वाचनालयाकडील आजतागायत एकूण २८२६ इतक्या सभासदांनी वाचनालयाचा लाभ घेतला असून चालू वर्षी २५० इतके सभासद आहेत.
- मुलांची व मुलींची प्रशस्त अभ्यासिका असून दररोज इचलकरंजी शहरातील व आसपासच्या गावातील ९०० ते १००० विद्यार्थी अभ्यासाकरिता येतात.
- आतापर्यंत २८४ विद्यार्थी महाराष्ट्र राज्यात विविध ठिकाणी प्रशासकीय सेवेत आहेत. चार्टर्ड अकौंटंट परीक्षेत आजतागायत ५९ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. सन २०२५-२६ मध्ये ३५ विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेली आहेत. विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत.
- दरवर्षी गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत व्याख्याते यांनी व्याख्याने दिलेली आहेत.
- गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय विभाग नियंत्रण अधिकारी मा. नंदू परळकर (उपायुक्त)
- गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय विभागप्रमुख (ग्रंथपाल) श्रीमती बेबी नदाफ, लिपिक -१, शिपाई -१ आणि सफाई कामगार – ३ असा स्टाफ कार्यरत आहे.
- मा. महासभा क्र. ०१ सर्वसाधारण सभा, ठराव क्र. १७ दि. ३०/०४/२०२६ नुसार

  <u>वाचनालय सभासद फी</u> –

  वाचनालय प्रवेश फॉर्म फी- २५/-

  वाचनालय डिपॉझीट फी- ३०० /-

  वाचनालय मासिक फी – ४८० /-

  ----------------

  एकूण फी- ८०५/-

  प्रवेशाकरिता अटी शर्ती – सभासद हा इचलकरंजी शहराचा रहिवासी असावा.

  <u>अभ्यासिका सभासद फी-</u>

  अभ्यासिका प्रवेश फॉर्म फी- २५/-

  अभ्यासिका ओळखपत्र- २५/-

  अभ्यासिका वार्षिक फी- ३००/-

  ------------------

  एकूण फी- ३५०/-